# बृहन्मुंबई महानगरपालिका
## घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

# <u>सूचना</u>

विषय: पी/दक्षिण विभागात 'मॅनिंग मॉपिंग योजना' राबविण्याबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की **दि. 08 फेब्रुवारी, 2024 ते दि. 31 जुलै, 2024** या पुढील **06 महिन्याच्या** कालावधीकरीता मॅनिंग व मॉपिंग योजने अंतर्गत साफसफाईच्या कामकरीता वरील विषयांस नमूद करण्यात आलेल्या योजनांतर्गत कामगार / स्वयंसेवक पुरविण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग ह्यांच्या कार्यालयात निशुल्क उपलब्ध असून त्या **दि. 27 जानेवारी, 2024 ते दि. 02 फेब्रुवारी, 2024** पर्यंत **सकाळी 11:00 ते दुपारी 04:00** वाजेपर्यंत मिळतील. अर्ज भरताना सोबत छाननी शुल्क रु. 3000/- अधिक 18% जीएसटी इतके रोखीने नागरीक सुविधा केंद्रामध्ये भरलेल्याची पावती जोडणे अनिवार्य आहे. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण यांच्या कार्यालयात **दि. 03 फेब्रुवारी, 2024 दुपारी 04:00 वाजेपर्यंत** सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी 07 संस्थांची दि. 07 फेब्रुवारी, 2024 रोजी दुपारी 01:00 वाजता **सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या अध्यक्षांस / सचिवास /खजिनदार पैकी कोणत्याही एकास उपस्थित रहाणे बंधकारक असेल. सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

सही/- 25.01.2024

**सहाय्यक आयुक्त (पी/दक्षिण)**